




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १३० •शनिवार, दि. ०९ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# आठ वर्षानंतर आईवडिलांची झाली मुलाशी भेट..

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची कौतुकस्पद कामगिरी

## AHTU आणि LCB टीमची संयुक्त कार्यवाही

**बीड । प्रतिनिधी**

पोस्टे पिंपळेनर गुरन १४३/२०२३ कलम ३७३ भादवी मधील अल्पवयीन मुलगा राजु काकासाहेब माळी वय १६ वर्ष (२०१७ चे वय) हा घरातून निघून गेला होता.

सदर गुन्ह्याबाबत माहीती अशी की राजु हा दहावीचे शिक्षण घेण्यासाठी संगमेश्वर विद्यालय नालवंडी येथे शिकायला होता . त्याची राहण्याची सोय नसल्याने तो शिक्षक ज्ञानेश्वर राऊत यांच्या घरी राहत होता. आईवडीलांची परिस्थिती एकदम हलाकीची होती . ते ऊसतोडी कामगार असल्याने कर्नाटक राज्यात कामासाठी गेले होते. डिसेंबर २०१७ मधे राजु हा शाळा सुटल्यावर कोणाला काही एक न सांगता निघून गेला. याबाबत त्याच्या आई वडिलांना माहिती मिळाली तेव्हा त्यांना कर्नाटक वरून येण्यास आठ दिवस लागले. राजू चे आई वडिलांना वाटले की



राजू काही दिवसात परत येईल, व ते दोघेही अशिक्षित असल्याने त्यांनी गुन्हा दाखल केला नाही. असे करत पाच ते सहा वर्ष निघून गेले. पण राजु परत आलाच नाही, मग २०२३ मधे त्याच्या आईने पोस्टे पिंपळनेर ला गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा जानेवारी २०२५ मधे AHTU ला वर्ग झाला. पीएसआय पल्लवी जाधव यांनी AHTU चा चार्ज घेतल्यावर सदर गुन्ह्याच्या फाइल चे बारकाईने अवलोकन केले. आणि तपासास सुरवात केली. राजूच्या आईवडिलांची भेट घेतली त्यांचे अश्रु आणि दुःख खूप वेदनादायक होते. त्यानंतर राजूच्या शाळेत जावून त्याचे शिक्षकांची ही भेट घेतली व त्याच्या बाबत माहिति घेतली. त्यानंतर मागचे पाच वर्ष गुन्हा का दाखल झाला नाही म्हणून शिक्षक ज्ञानेश्वर राऊत यांची भेट घेतली. कारण सदर शिक्षकाच्या घरी राजू राहत होता, एखादा मुलगा आपल्या ताब्यातून निघून गेल्यावर त्याने गुन्हा दाखल का केला नाही? त्यांनीच राजु चे काही बरेवाईट तर केले नसेल ना असा संशय पीएसआय पल्लवी जाधव यांना आला. मग पीएसआय पल्लवी जाधव यांनी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत सर यांची भेट घेवून गुन्ह्याबाबत सर्व माहिती सांगितली व सदर शिक्षकावर संशय असले बाबत ही सांगितले. सरांनी सांगितले की तुम्ही पुढील

▶▶ उर्वरित पान २ वर

# एक कोटीचा गुटखा पकडला!

## केज मार्गे जात होता कळंबला गुटख्याचा ट्रक





**केज । प्रतिनिधी**

कळंब येथे केज मार्गे गुटखा घेऊन ट्रक जात असल्याची माहिती मिळताच केज पोलिसांनी कळंब रोडवर सापळा लावून संशयित ट्रक पकडून पाहणी केली असता त्यामध्ये राज्यात बंदी असलेला गुटखा आणि सुगंधित तंबाखू मिळून आली. सर्व गुटखा व ट्रक असा एकूण १ कोटी १ लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्यात गुटखा बंदी असतानाही अनेकजण कर्नाटक आणि मध्यप्रदेश येथून गुटखा आणून राज्यात विकत आहेत. यामुळे राज्यात केवळ कागदावरच गुटखा बंदी असल्याचे चित्र आहे. परंतु बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पदभार घेतल्यापासून अनेक अवैध धंद्यांसह अवैध गुटखा विक्रीवर कारवाया सुरू केल्या आहेत.

▶▶ उर्वरित पान २ वर

शेख तय्यब यांच्या अल्पसंख्यांक भवनाच्या मागणीवर दादा म्हणाले, पुढच्या वेळेस जागा पाहू

# बीडमध्ये अल्पसंख्यांक भवनाचा मार्ग मोकळा शेख तय्यब यांच्या मागणीला हिरवा कंदिल

**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांसाठी बीडमध्ये अल्पसंख्यांक भवन उभारण्यासाठी मंजुरी व निधी देण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन काल अल्पसंख्यांक मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे सदस्य शेख तय्यब यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना दिले. त्यावेळी तात्काळ या प्रस्तावास होकार देत पुढील दौऱ्यात अल्पसंख्यांक भवन उभारणीसाठी आवश्यक जागेची



पाहणी करू, असे आश्वासन दिले. त्यामुळे अल्पसंख्यांक भवन उभारले गेले तर एका छताखाली अल्पसंख्यांक समाजाचे विविध कार्यालये येतील आणि लोकांची कामे एका च३करमध्ये पुर्णत्वाकडे जातील. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार हे गेली दोन दिवस बीड जिल्हा दौऱ्यावर होते. त्या दरम्यान अल्पसंख्यांक मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे

▶▶ उर्वरित पान २ वर

**• दादा म्हणाले, राजुरीवेसचा रस्ता लवकरच होईल**

**मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी गेल्या दोन महिन्यांपूर्वी बीड शहरातील राजूरीवेस ते बलभीम चौक सिमेंट रस्ता, नाली बांधकाम आणि डॉ. झाकेर हुसैन मदरसा योजना अल्पसंख्यांक विभागामार्फत बीड जिल्ह्यातील मदरश्यांमध्ये जिल्हा नियोजनच्या माध्यमातून सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्याबाबत निवेदन दिले होते. जिल्हा परिषद ते राजूरीवेस आणि राजुरीवेस ते बलभीम चौक हा रस्ता लवकरच केला जाईल. त्याचबरोबर मदरश्यांमध्ये सौरऊर्जा संच बसवण्याबाबतही अजितदादांनी कारात्मतेने घेत ही दोन्ही कामे लवकर पुर्णत्वाकडे जातील, असे आश्वासन शेख तय्यब यांना दिले.**

# आज गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगता

**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाची उद्या शनिवार दि ९ ऑगस्ट रोजी काल्याच्या कीर्तनाने महाप्रसादाने सांगता होणार आहे.

सकाळी ४ वाजता किसन बाबा महाराज यांच्या समाधीची पूजन गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते विधिवत करण्यात येणार आहे. सकाळी ११ ते ०१ वेळेत विदर्भरत्न रामायणाचार्य संजयजी



महाराज पाचपोर बुलढाणा यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यांना कीर्तन साथ नानाभाऊ म .लांडे, लक्ष्मीकांत म .कदम यांची व मृदुंगसाथ धनंजय म.बोंगणे , अनिकेत म .लांडे यांची राहील. काल्याचे कीर्तन झाल्यावर महाप्रसादाच्या महापगती बसवण्या येतील महाप्रसादाच्या महापांगतीने सात दिवस सुरू असणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

▶▶ उर्वरित पान २ वर

# ग्रा.पं.कर्मचाऱ्यांचा पगार नियमित करा

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन



**बीड । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत कार्यालयाअंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियमित पगार होत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत आहे. राज्य सरकारने त्यांचा पगार नियमित करावा, या मागणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येत आहे. हे आंदोलन कॉ. नामदेव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यामध्ये ग्रा. पं.अंतर्गत काम करणारे अनेक कर्मचारी आहेत. या कर्मचाऱ्यांच्या पगारा राज्य सरकार वेळेवर करत नाही. पगारासाठी

▶▶ उर्वरित पान २ वर

# नाशिकमध्ये भीषण अपघात! मद्यधुंद चालकाने शाळकरी विद्यार्थ्यांना उडवलं; एकाचा मृत्यू, १२ जखमी

**नाशिक । प्रतिनिधी**

मुंबई-आग्रा महामार्गावर नाशिकमधील चांदवडजवळ भीषण अपघात झाला आहे. एका छोटा हत्ती टेम्पोने शाळकरी विद्यार्थ्यांना उडवलं आहे. या धडकेत बारा ते तेरा शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनी जखमी झाले आहेत. यातील एकाचा मृत्यू झाला असून ५ विद्यार्थिनींची प्रकृती चिंताजनक आहे. शाळा सुटल्यानंतर मुंबई-आग्रा महामार्ग ओलांडताना हा अपघात झाला आहे.




१३ विद्यार्थी जखमी - समोर आलेल्या माहितीनुसार मुंबई-आग्रा महामार्गावरील चांदवडजवळ असणाऱ्या सोग्रसमध्ये या वाहनाने शाळकरी मुलांना धडक दिली. या अपघातावेळी चालक मद्यधुंद अवस्थेत होता अशी माहिती समोर आली आहे. या अपघातात १२-१३ विद्यार्थी जखमी झाले आहेत. या सर्व जखमींना चांदवड येथे शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या सर्वांवर उपचार सुरु आहेत.

रुग्णालयात जमली मोठी गर्दी- या अपघातावेळी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे नाशिक वरून मालेगावकडे जात होते, मात्र अपघाताची माहिती मिळताच त्यांनी चांदवड येथे शासकीय रुग्णालयात जाऊन जखमी विद्यार्थ्यांची विचारपूस केली आणि वाहन चालकावर कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. सध्या जखमी विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी रुग्णालयात मोठी गर्दी झाल्याचे पहायला मिळत आहे.

स्पीड बेकर व झेब्रा कॉस क्रॉसिंग बनवणार - दादा भुसे- याबाबत बोलताना शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी म्हटले की, चांदवड तालुक्यातील सोग्रस येथे दुर्दैवी अपघात झाला. यात तेरा मुलं मुली जखमी झाले आहे. या ठिकाणी ▶▶ उर्वरित पान २ वर

# गोसावीं चा 'नेक' राहिला नाही 'नूर', वाहतोय अवैध दारूचा महापूर

**बीड । प्रतिनिधी**

नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत खेडोपाडी उघडलेल्या धाब्यांमधूनअवैध दारूची सर्रास विक्री केली जात आहे. यामध्ये गोवा राज्यातून तस्करी केलेली दारू देखील उपलब्ध होऊ लागली आहे. तीच स्थिती महामार्ग तसेच राष्ट्रीय महामार्गावरील धाब्यामध्ये देखील पाहायला मिळत आहे. यातून पोलीस ठाण्याला मोठी कमाई होत असली तरी गरिबांची घरं उध्वस्त होऊ लागली आहेत. एकूणच ठाणे प्रमुख चंद्रकांत गोसावींचा नेक नूर राहिला नसल्याचं चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या नाकाखाली वक्फ जमिनीवर अतिक्रमण !

## हजरत शहंशावली दर्ग्याच्या जमिनीवर कब्जे करणाऱ्या लोका विरोधात वक्फ बोर्ड कारवाई कधी करणार ?

## बीड शहरातील अतिक्रमण काढणाऱ्या समीर काजींना राज्यातील अतिक्रमणे काढण्याची भाषा बोलू नये !

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात असलेल्या प्रसिद्ध दर्गा शहीद शहावली साहेब बीड यांच्या नावे नोंद महाराष्ट्र शासन राजपत्रित अनुक्रमांक एक भाग बीडमध्ये सदरील दर्गा मस्जिद सराई समाखाना व कब्रस्तान इनाम जमीन सर्वे नंबर २५ एकूण क्षेत्र ११९ २४ गुंठे असून यापैकी ३०० बाय २०० फुटाचे परिसर दर्ग्यासाठी राखीव ठेवलेले आहे या व्यतिरिक्त दर्गाचे सेवेसाठी ३३



नंबर इनाम जमीन एकूण क्षेत्र ७९६ ३७ बहाल आहेत या सर्वांच्या



नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र यामध्ये १९७४ मध्ये जोडलेले आहे. दर्गा शहेनशहा दर्गा परिसरात लोकांनी अतिक्रमण करत घरे बांधली आहे. गेल्या अनेक दिवसापासून सदरील अतिक्रमण काढण्यासाठी जिल्हा वक्फ बोर्डाच्या कार्यालयाच्या पायऱ्या झिजवण्याचे वेळ येथील मोहम्मद रहमदिन शमशोधन इनामदार यांच्यावर आली आहे. विशेष म्हणजे बीड येथील रहिवासी असलेले वक्फ बोर्डाचे सध्याचे अध्यक्ष समीर काझी यांनी राज्यभरातील अतिक्रमण केलेल्या वक्फ बोर्डाच्या जमिनी खाली करणार असल्याचे सांगितले होते. मात्र तहान घशाला व धरण उशाला अशी म्हणण्याची वेळ आली आहे. बीड शहरात राहत असलेले अध्यक्ष शरद झालेले दर्गा शहंशाह वली परिसरातील अतिक्रमण काढण्यात अकार्यक्षम ठरले आहे.

राज्यमंत्री दर्जा प्राप्त असलेल्या पदावर बीड शहरातील समीर काजी हे वक्फ बोर्डाच्या अध्यक्षपदी विराजमान झाले आहेत. राज्यभरातील बोर्डाच्या

▶▶ उर्वरित पान २ वर




# यंदाच्या रक्षाबंधनाला कोणत्या रंगाची राखी बांधू नये, पहा मंगळाच्या या वर्षात राखीसाठी कोणता रंग टाळावा ?

राखी बांधताना तिची डिझाईन पाहून आपण खरेदी करतो. बाजारात अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या रंगाच्या डिझाईनच्या राख्या आलेल्या आहेत. तसेच चांदी सोने अशा देखील राख्या काहीजण बांधतात. मात्र राखी बांधताना काही गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. राखी कोणत्या रंगाची बांधावी यामागे देखील शास्त्र आहे. यंदाच्या राखीपोर्णिमेला या रंगाची राखी बांधणे टाळायला हवे अन्यथा अघटित घडू शकते असे शास्त्रच सांगत आहे. पाहुयात कोणत्या रंगाची राखी यंदा टाळावी.

राखी पौर्णिमा हा सण प्रत्येक भावा बहिणीसाठी खास असतो. राखी येण्यापूर्वीची या सणाची जोरदार तयारी भाऊ बहीण दोघेही करतात. बहिणींची सुरुवात होते राखी खरेदीपासून. सुंदर डिझाईनची राखी आपल्या भावाच्या हातात बांधावी म्हणून प्रत्येक बहीण राखी खरेदी करताना खूप गोष्टी पाहते. अमुक रंग वेगळी डिझाईन आणि सर्वात वेगळी पण सुंदर राखी माझ्या भावासाठी घेणार असा हट्ट बहिणींचा असतो. या सर्व गोष्टी तर ठीक आहेत. मात्र राखी बांधताना एक गोष्ट सर्वात महत्वाची म्हणजे तिचा रंग. कोणत्या वर्षी कोणत्या रंगाची राखी बांधू नये याचे शास्त्र आहे. यंदा देखील हे मंगळाचे वर्ष असल्याने यावर्षी विशिष्ठ रंगाची राखी बांधणे टाळावे. पाहुयात कोणत्या रंगाची राखी बांधू नये.

यंदाचे वर्ष हे मंगळाचे वर्ष आहे असे म्हणतात. कारण हे वर्ष २०२५ म्हणजेच याची बेरीज ९ येत असल्याने ९ नंबर हा मंगळाचा नंबर मानतात. त्यामुळे हे वर्ष थोडे धोकादायक असल्याचे देखील मानतात. ज्याप्रकारे नैसर्गिक आपत्ती आणि दुर्घटना होत आहेत त्यावरून हे मंगळाचे वर्ष असल्याने थोडे सतर्क राहण्याचा ईशारा देखील ज्योतिषांनी या वर्षासाठी दिला आहे. मंगळ हा ग्रह शक्ती, ऊर्जा, क्रोध यांच्याशी संबंधित मानला जातो. त्यामुळे मंगळाच्या वर्षात ऊर्जा अधिक प्रमाणात पहायला मिळतेय. मंगळाचा रंग हा लाल



मानला जात असल्याने यावर्षी लाल रंगाची राखी बांधू नये असे बोलले जात आहे. हा मेसेज सध्या सोशल मीडियावर फिरतोय.

लाल रंगाची राखी न बांधण्याचे सत्य

राखीपोर्णीमेला शुभ मुहूर्तावर भावाला औक्षण करून पारंपरिक पद्धतीने राखी बांधण्याची प्रथा आहे. मात्र यंदाच्या रक्षाबंधनाला लाल रंगाची राखी बांधू नये अशा बातम्या सोशल मीडियावर फिरत आहेत. यामागे काय सत्य आहे हे ज्योतिष सांगतात. ज्योतिषांनुसार लाल रंग हा आपल्याकडे शुभ मानला जातो. प्रत्येक धार्मिक कार्यात लाला रंगला म हत्व देण्यात आलेले आहे. देवांचे आसन म्हणून देखील आपण लाल रंग वापरतो तर सौभाग्याचे प्रतीक म्हणून देखील लाल रंगच असतो. त्यामुळे लाल रंग हा अशुभ नसून तो मंगळाचा रंग असला तरी देखील शुभ असतो. यामुळे निश्चिन्त होऊन तुम्ही कोणत्याही रंगाची राखी बांधू शकता असे ज्योतिषशास्त्र सांगते.

## रक्षा बंधन



रक्षा बंधन हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा आणि हृदयस्पर्शी सण आहे. हा सण भाऊ–बहीण यांच्या अतूट नात्याचे प्रतीक मानला जातो. श्रावण पौर्णिमेच्या दिवशी हा सण साजरा केला जातो. या दिवशी भगिनी आपल्या भावाच्या उजव्या हातावर राखी बांधते आणि त्याच्या आयुष्यात आनंद, आरोग्य, आणि यशासाठी ईश्वराकडे प्राथना करते. तिच्या या प्रेमळ भावनेच्या प्रती उत्तरादाखल भाऊ तिला आयुष्यभर तिचे रक्षण करण्याचे आणि संकटात सोबत देण्याचे वचन देतो.

रक्षा बंधन म्हणजे केवळ एक औपचारिक सण नाही, तर तो प्रेम, विश्वास, आणि जबाबदारी यांचा संगम आहे. लहानपणापासूनच हा सण घरगुती आनंद, मिठाया, गोड गाणी, आणि छान किस्से यांच्या मनमोहक आठवणी देतो. मोठेपणीही हे नाते अधिक घट्ट होते.आजच्या धावपळीच्या जगातही, रक्षा बंधनची परंपरा बहीण–भावांमध्ये प्रेम, स्नेह आणि नात्याचा बंध कायम ठेवते. जी एक अनोखी आणि सुंदर अशी आपली भारतीय परंपरा आहे. रक्षाबंधन हा सण केवळ भाऊ–बहिणीच्या नात्यापुरता मर्यादित नसून त्यामागे खोल धार्मिक, पौराणिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. खाली त्याबद्दल अजून माहिती:

रक्षाबंधनाचे अर्थ– 'रक्षा' म्हणजे संरक्षण आणि 'बंधन' म्हणजे बंध. हे केवळ राखी बांधाण्याचा सोहळा नसून संरक्षण, प्रेम, जबाबदारी आणि नात्याचा आदर यांचे प्रतीक आहे.

● राखी बांधण्याची रीत– बहीण आपल्या भावाल ओवाळते, मिठाई देते आणि त्याच्या उजव्या मनगटाला राखी बांधते. त्या वेळी, बहीण त्याच्या आरोग्य, यश आणि दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते, तर भाऊ तिला आयुष्यभर रक्षणाचे वचन देतो.

● कुटुंबात एकत्र येणे – या दिवशी कुटुंब मिळून हा सण साजरा करतात. विवाहित बहिणी माहेरी येतात, घरात आनंदाचे वातावरण असते, आणि भावाकडून बहिणीला भेट दिली जाते.

● शास्त्रीय (वैज्ञानिक) महत्व– राखीचे घटक: राखी मध्ये रेशीम, तांदूळ, केसर, चंदन किंवा दुर्वा वापरतात, जे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याच्या दृष्टीने उपयुक्त मानले जातात.

● नात्याचे बळकटीकरण – या प्रथेमुळे भाऊ–बहिणीचे नाते दृढ होते, प्रेम, जबाबदारी आणि परस्पर सन्मान वृद्धिंगत होतो.

● आधुनिक काळातील विस्तार– आज राखी रक्ताच्या नात्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. जवळचे मित्र, शेजारी, किंवा स्नेही व्यक्तीकडूनही राखी बांधली जाते. सार्वजनिक जीवनात सुद्धा काही स्त्रिया सैनिक, अधिकारी किंवा सामाजिक कार्यकर्त्यांच्या हातावर राखी बांधतात, हे एक सामाजिक ऐक्य दर्शवणारे उदाहरण आहे.

● सामूहिक उत्तम बंधन– रक्षाबंधनामुळे समाजात आदर, विश्वास, संरक्षण या मूल्यांची गोडी वृद्धिंगत होते आणि मानवी संबंधात प्रेमाचे जाणीवपूर्वक बंध जोडले जातात.

*रक्षा बंधनच्या या पवित्र दिवशी सर्व बंधू–भगिनींना हार्दिक शुभेच्छा!*

– संकलन
शबनम मुजीब खान
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

◆ पान १ वरून पुढे...

### आठ वर्षानंतर...

तपासात LCB ची मदत घ्या. व तसा आदेश त्यांनी पोनी शिवाजी बंटेवाड एलसीबी यांना दिला. पोनि बंटेवाड सर यांनी पीएसआय पल्लवी जाधव यांच्या मदतीसाठी पीएसआय श्रीराम खटावकर यांना आदेश दिला. त्यानंतर दोघांनी मिळून तपास सुरू केला. सदर शिक्षकाकडून काही एक माहिती मिळाली नाही. त्यानंतर पीएसआय खटावकर यांनी टेक्नीकल टीम च्या मदतीने राजू ची माहिती काढली. सदर माहितीवरून राजूचे लोकेशन पुणे येथे असल्याचे समजले. व त्याला शोधून विश्वासात घेवून पुणे वरून बीड ला आणले. आज रोजी सकाळी पीएसआय खटावकर यांनी राजू ला पुढील तपासकामी पीएसआय पल्लवी जाधव यांच्या ताब्यात दिले.त्यानंतर त्यास पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या समोर हजर केले. त्यावेळी तेथे राजूचे आई वडील ही हजर होते. त्यांच्यासाठी ही विशेष भेट सरांनी घडवून आणली. सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोनि शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव , पोलीस उप निरीक्षक श्रीराम खटावकर , पोलीस हवालदार असिफ शेख, आनंद म्हस्के, हेमा वाघमारे , उषा चौरे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोना अर्जुन यादव, पोलीस शिपाई प्रदीप वीर, योगेश निर्धार सर्व नेमणूक AHTU व LCB टीम यांनी केली.

### एक कोटीचा...

संबंधित यंत्रणेला यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. काल गुरुवारी (दि.७) पोलिसांना केज मार्गे कळंब येथे ट्रक भरुन गुटखा जात असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम यांनी सहकायारना सोबत घेऊन कळंब रोडवर सापळा लावला असता कळंब रोडवरील एच.पी. पेट्रोल पंपा समोरुन येताना संशयित पांढरा ट्रक क्रमांक डी.डी. ०१ एस ९४४२ हा येताना दिसला त्यास थांबविले तपासणी केली असता त्यामध्ये अनेक पोत्यात गुटखा आणि जाफरानी जर्दा आढळून आला. यावेळी दोन पंच बोलावून त्यांच्या समोर पंचनामा केला. यामध्ये राजनिवास, डायरेक्टर, शॉट ९९९ हा गुटखा आणि ट्रक असा मिळून १ कोटी १ लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. हा गुटखा इंदोर येथून कळंब येथे जात होता. असे निष्पन्न झाले आहे. परंतु केज पोलिसांच्या जागरुे मुळे हा गुटखा पकडला आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात आरोपी चालक रईसोद्दीन अमीरोद्दीन शेख रा. रतलाम (मध्यप्रदेश), परशुराम मोहन गायकवाड रा. एकनाथवाडी (ता. पाथर्डी) ह.मु. बीड, गुटखा पाठविणारा जालीमसिंग (पूर्ण नाव नाही ) रा. बेरहामपूर आणि खरेदी करणारा रुपेश मालपाणी रा. कळंब (जि.उस्मानाबाद) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई केज पोलिसांनी केली आहे.

### शेख तय्यब यांच्या...

सदस्य शेख तय्यब यांनी काल उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेतली. बीड जिल्ह्यातील अल्पसंख्यांक

### आज गोरक्षनाथ...

◆ पान १ वरून पुढे...

होणार आहे गुरुवर्य किसानबाबा यांच्या पुण्यस्मरणार्थ गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपूर्ण सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, प्रवचन कीर्तन, अभंगवाणी, भारुड, हरी जागर यांनी भक्तीमय वातावरणात भाविक भक्तांनी भक्तीचा आनंद घेतला. जास्तीत जास्त भाविक भक्तांनीउपस्थित रहावे असे आवाहन गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी केले.

### ग्रा.पं.कर्मचाऱ्यांचा...

व इतर मागण्यांसाठी आज संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये अनेक कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. हे आंदोलन कॉ. नामदेव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

### नाशिकमध्ये भीषण...

स्थानिक ग्रामस्थांची मागणी एक उड्डाणपूल झाला पाहिजे. आता तात्काळ स्पीड बेकर झेब्रा कॉस क्रॉसिंग दोन दिवसाच्या आत केले जाईल. विद्यार्थ्यांचा शाळेचे वेळ असतो त्यावेळी जाण्यासाठी सुविधा करून दिल्या जातील. मृत विद्यार्थ्यांचा पालकांना ४ लाखांची मदत पुढे बोलताना दादा भुसे म्हणाले की, 'जे काही विद्यार्थी जखमी झाले असे संदर्भात संपूर्ण माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आली आहे. सर्व जखमींचा खर्च शासनाच्या वतीने केला जाईल. दुर्दैवाने यामध्ये एक जण मृत्युमुखी पडला आहे. त्याच्या पालकांना शासनाच्या वतीने चार लाख रुपये मदत देण्याची घोषणी मुख्यमंत्र्यांनी केली आहे.'

### वक्फ बोर्डाचे...

जागा अतिक्रमणाच्या विळख्यात सापडलेल्या आहेत या सर्व जागा आपण खाली करणार असल्याचे समीर काझी यांनी म्हटले होते मात्र बीड शहरात अनेक दर्गा मस्जित कब्रस्तान यांच्या जागेवर लोकांनी अतिक्रमण केले आहे यासह अनेक जागा भूमाफियनी विक्री केलेल्या आहेत. विशेष म्हणजे राज्यभरातून दर्शनासाठी बीड शहरातील पूर्वे भागास इस्लामपुरा येथे असलेल्या हजरत शहंशाह वली दर्गा परिसरात ७५ टक्के लोकांनी अतिक्रमण केले आहे. या संदर्भात प्रशासनाला व वक्फ बोर्डाला अतिक्रमण काढण्यासाठी दर्ग्याचे मूत्वल्ली मोहम्मद रहिमदिन इनामदार यांनी निवेदन दिले आहे. मात्र याची दखल प्रशासनाने व वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी घेतली नाही. या बोर्डाचे अध्यक्ष सध्या बीड येथील रहिवासी समीर काझी आहेत मात्र मोठ्या गप्पा मारणारे अध्यक्ष हजरत शहंशाह वली दर्गा परिसरात लोकांनी बांधलेली घरे पाडतील का? मागील अनेक वर्षापासून दर्गा परिसरातील जमिनीवर येथील लोकांनी कब्जा करत घरे बांधली आहे यासाठी काही भूमाफियांनी बॉण्डवर या जागा विकले आहेत. खरे पाहता या परिसरात अतिक्रमण करणे कायद्याने गुन्हा असून या विरोधात वक्फ बोर्ड सक्तीची कारवाई करू शकतो यासाठी गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया ही होऊ शकते मात्र दर्गा परिसरात गेल्या अनेक वर्षापासून अतिक्रमण होत राहिली आहे या विरोधात येथील दर्ग्यांचे सेवेकरी यांनी अनेक वेळा वक्फ बोर्डाकडे निवेदन अर्ज दिले आहेत मात्र याकडे जाणून–बुजून दुर्लक्ष करण्यात येत आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### एकीकडे स्मशानभूमी...

गावपुढा–यांनी गावापासून अडीच किलोमीटर दुर असलेल्या गायरान जमिनीत स्मशानभूमीचे बांधकाम केलेले आहे. बहुतांश शेतकरी आपल्या शेतात अंत्यविधी करतात तर भुमिहीन असणारे गावालगत नदीच्या ओढ्यात अंत्यविधी करतात. अडीच किलोमीटर गावाच्या बाहेर अंत्यविधीसाठी कोणीही याठिकाणी येत नाही. स्मशानभूमीत ठेवण्यात आलेली लोखंडी जाळी सुद्धा नंतर काढुन नेण्यात आली. त्यामुळे हि स्मशानभूमी वापराविना पडुन असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले. स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण गंभीर प्रश्न असुन जिल्हा प्रशासन स्मशानभूमीच्या जागा सुरक्षित कराव्यात : डॉ.गणेश ढवळे –स्म शानभूमीच्या जागेवर होणारे अतिक्रमण हा गंभीर प्रश्न आहे.या अतिक्रम णामुळे स्मशानभूमीची जागा ईतर कारणासाठी वापरली जात आहे. त्यामुळे तेथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याच्या मुलभूत हक्कावर गदा येत आहे. स्मशानभूमीच्या जागेवरून समाज आणि स्थानिक प्रशासन मध्ये संघर्ष निर्माण होतो आहे.अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करावी आणि जागांचा ताब घेऊन त्या सुरक्षित कराव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

### पिंपळनेर येथे...

करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नवनाथ थोटे, तालुका उपाध्यक्ष शेख कादर बाबमिया, इंटक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामधन जमले, विद्यार्थी काँग्रेसचे रोहित नवले, भैय्या गोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना गणेश बजगुडे पाटील म्हणाले की, बीड तालुका व मतदार संघात काँग्रेसचा मतदार मोठ्या प्रमाणात आहे. एकेकाळी बीड

◆ पान ४ वरून पुढे...

हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता परंतु आघाडीच्या राजकारणात मागील २५ वर्षात काँग्रेसने निवडणुकच लढवली नाही म्हणुन पक्षाची पडझड झालेली होती. काँग्रेसच्या चिन्हावर निवडून आलेली अनेक मंडळी काँग्रेसला सोडुन गेली परंतु जनता मात्र आजही काँग्रेसच्या सोबत आहे. मी तालुक्यात आणि मतदार संघात फिरत असताना लोक पंजाच्या शोधत आज देखील असल्याचे दिसुन आले आणि म्हणुन हार जीत जे काय व्हायचे ते होईल परंतु लोकभावनेचा आदर व पक्ष संघटन मजबुत करण्याच्या दृष्टीने निवडणुका स्वतंत्र लढाव्या लागतील आणि आपल्या नेत्या खासदार रजनीताई पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील, प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड तालुक्यातील सर्वच्या सर्व निवडणुका लढू आणि जिंकू देखील, त्याच बरोबर पिंपळनेर येथील युवा नेते अण्णा उर्फ पिनू डांगे यांची लवकरच बीड तालुका कार्यकारणीत महत्त्वाच्या पदावर निवड करण्यात येईल असेही तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी सांगितले. यावेळी नवनाथ थोटे यांनी देखील आपल्या भाषणात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पिंपळनेर येथील शाखाअध्यक्ष सुनील माळी, उपाध्यक्ष अमोल बन, सचिव बाबासाहेब आरे, कोषाध्यक्ष बाबुराव लोंढे, विनायक आरे आदी पदाधिकाऱ्यांसह ज्यांनी नुकतच काँग्रेस प्रवेश करुन शाखेचे आयोजन केले असे भावी पंचायत समितीचे उमेदवार अण्णा ऊर्फ पिनू डांगे यांचा देखील सत्कार करुन सर्वांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, ज्येष्ठ नेते नवनाथ थोटे, तालुका उपाध्यक्ष शेख कादर बाबमिया, इंटक काँग्रेसचे अध्यक्ष रामधन जमले, विद्यार्थी काँग्रेसचे रोहित नवले, भैय्या गोरे आदी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ. योगेश क्षीरसागर...

स्ट्रीटलाईट सुरू करणे, नव्या स्ट्रीटलाईट आणि मिनी हायमास्ट

◆ पान ४ वरून पुढे...

बसवणे, चौकाचौकातील लाईट कार्यान्वित करणे, नवीन पोल बसवून एलईडी लाईट बसवणे, पाणी पुरवठा सुरळीत व वेळेवर करणे, पाईपलाईन लिकेज दुरुस्त करणे तसेच अमृत अटल पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासाठी प्रयत्न करणे. तसेच, स्व. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (नागोबागल्ली), बौद्धविहार दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली. पंतप्रधान आवास घरकुल योजना आणि रमाई घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते वाटप करणे, शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे, अतिक्रमण हटवणे, प्रमुख रस्त्यांना मंजुरी देणे (स्टेडियमजवळील रस्ता, धानोरा रोड, ब्रह्मकुमारी केंद्र ते उर्वी अपार्टमेंट, तहसील ते निरा हॉस्पिटल मार्ग), प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजवणे आणि दलित वस्ती तसेच इतर नागरी वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविणे यांसारख्या मागण्या निवेदनात नमूद आहेत. शहरातील दैनंदिन जीवनाशी निगडित या सर्व समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शिष्टमंडळाने केली असून, मुख्याधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, माजी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भीषण अपघातात ...

घाटेवाडीतील या चिमुकल्यांसाठी दिलेली मदत केवळ आर्थिक नाही, तर संपूर्ण समाजात माणुसकीचा संदेश पसरवणारी आहे.या म दतकार्यावेळी अशोक दादा शिंदे, राहुल बप्पा शिंदे, बाबुराव बावणे,भरत आरसुळ,संग्राम आरसुळ यांसह इतर मान्यवर, मित्र परिवार आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी परमेश्वर येवले पाटील यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले.या घटनेतून आपल्याला दोन मोठे संदेश मिळतात रस्ते सुरक्षिततेचे नियम काटेकोरपणे पाळणे जेणेकरून

◆ पान ४ वरून पुढे...

अशा दुर्दैवी घटना टाळता येतील.व अडचणीत असणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे कारण माणुसकी हीच खरी संपत्ती आहे. घाटेवाडीतील वायकर कुटुंबाच्या चिमुकल्यांसाठी मदतीची परमेश्वर येवले पाटील यांनी केलेली ही साखळी आता आणखी मजबूत होईल,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कारण जेव्हा समाज आणि संवेदनशील नेते एकत्र येतात, तेव्हा कोणतेही दुःख हरवणे कठीण नसते.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी..

प्रत्येकी प्रथम पारितोषिक रक्कम १०,०००/– द्वितीय पारितोषिक रक्कम ७,०००/– व तृतीय पारितोषिक रक्कम ५,०००/– व सन्मानपत्र देवून गौरव करण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. १) रांगोळी स्पर्धा: श्री. देशपांडे गोविद दिगांबर मो. ९०१११४४३१४, २) वक्तृत्व स्पर्धा : श्री. शुक्ला प्रसाद उमाकांत मो. ९१३०९५४०९५, ३ ) निवध स्पर्धा श्री शिनगारे विशाल मच्छिद्र मो. ९०२८८५६८०२, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती निमित्त आयोजित विविध स्पर्धेत जास्तीत–जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे, सहायक संचालक डी.बी. क्षीरसागर यांनी केले आहे.

### हृदय विकाराच्या...

प्रशासनाला सांगितले. तेव्हा त्या रुग्णाची आधार हॉस्पिटल येथे महात्मा ज्योतिबा फुले योजनेअंतर्गत मोफत हृदयाची शस्त्रक्रिया करून देण्यात आली. त्यामुळे रुग्ण आणि रुग्णाचे नातेवाईक यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे आरोग्यदूत बाजीराव चव्हाण आणि वैद्यकीय बीड जिल्हाध्यक्ष महादेव मातकर यांचे आभार मानले आहे. यावेळी रुग्णाला मदत करण्यासाठी सोबत हरिदास कदम यांनी ही सहकार्य केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा












**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख यांचा वाढदिवस अनेक सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. विशेष करून काल परमेश्वर सातपुते सर यांच्यावर बीड जिल्ह्यासह बीड शहर व पिंपळनेर सर्कल मधील विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून जणू शुभेच्छाचा वर्षाव सुरू होता... शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धवजी साहेब ठाकरे यांनी वाटसवद्वारे तर शिवसेनेचे सचिव तथा शिवसेना नेते विनायकजी राऊत साहेब यांनी फोनवरून शुभेच्छा दिल्या तर बीड जिल्ह्याचे लाडके खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी दिल्लीला आसतानाही फोनवरून शुभेच्छा दिल्या, याचप्रमाणे आमदार माजी आमदार माजी मंत्री, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तसेच अनेक विविध पक्षाचे आजी माजी जिल्हाप्रमुख, जिल्हाअध्यक्ष, सामाजिक संघटनाचे पदाधिकारी विवध पक्षाचे तालुकाध्यक्ष, उपजिल्हाप्रमुख, तालुका प्रमुख सर्व पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक बंधू भगिनी, त्याचप्रमाणे पत्रकार, डॉक्टर, वकील, शिक्षक, सर्व स्नेही मित्र सहकारी युवा, जेष्ठ शेतकरी कष्टकरी यांच्या सह सर्वजण यांनी वेगवेगळ्या माध्यमातून प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रेमरूपी शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

समाजासाठी झटणाऱ्या नेतृत्वाचा वाढदिवस केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता न ठेवता सामाजिक कार्यांनी साजरा करावा, ही प्रेरणा देणारा एक वेगळाच आदर्श शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त घालून दिला. त्यांचा वाढदिवस यंदा पिंपळनेर सर्कल अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये रक्तदान, शैक्षणिक साहित्य वाटप, सामाजिक उपक्रम आणि जनसंपर्काच्या कार्यक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात आणि सेवाभावी दृष्टिकोनातून साजरा करण्यात आला. या विशेष दिनाचे औचित्य साधून बाभळवाडी येथील श्री जगदंबा पेट्रोलियम परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक जाणीव जोपासली. या शिबिराचे आयोजन स्थानिक त्यांचे सर्व सहकारी व कार्यकर्ते आणि आरोग्य विभागाच्या सहकार्याने यशस्वी पार पडले. सातपुते सर यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपळनेर येथील सनराईज इंग्लिश स्कूल, कन्या शाळा, जिल्हा परिषद शाळा, तसेच बाभळवाडी, बेडूकवाडी, लिंबारूई येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये शालेय साहित्य वाटप करण्यात आले. सुमारे ६०० हून अधिक विद्यार्थ्यांना वह्या, पेन, कंपास, शालेय दप्तर व अभ्यासासाठी आवश्यक साहित्य वितरित करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून ग्रामस्थ भावूक झाले. शिक्षण हीच खरी ताकद आहे या विचाराला अनुसरून, सातपुते सरांनी या वाटपामागची भावना विद्यार्थ्यांच्या प्रगतीत सहभागी होण्याची असल्याचे सांगितले. दिवसभर शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे सर्व सहकाऱ्यांच्या, हितचिंतकांच्या, ज्येष्ठ युवा तरुण, सर्वांच्या शुभेच्छा व विविध सामाजिक उपक्रम पार पडल्यानंतर सायंकाळी बाभळवाडी, सांडरवण, पिंपळनेर, बेडूकवाडी, नाथापुर या गावांमध्ये सातपुते सरांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गावोगाव रांगोळ्या, फुलांची सजावट, तसेच फटाक्यांची आतषबाजी करत वातावरण आनंदमय करण्यात आले. स्थानिक तरुण, वृद्ध नागरिक, शाळकरी मुले, सर्वजण या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. सर्वच गावांमधून सरांना शेकडो नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी उपस्थिती लावली. या संपूर्ण वाढदिवस सप्ताहाचे नियोजन सातपुते सरांचे निष्ठावान कार्यकर्ते, युवा सहकारी, ग्रामस्थ व स्थानिक शिक्षक वर्ग यांच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रम कुठेही औपचारिक न ठेवता खऱ्या अर्थाने समाजाभिमुख, लोकसहभागातून घडवलेला उत्सव ठरला. या सर्व ठिकाणी कार्यक्रमास गावातील गावकरी ज्येष्ठ नागरिक व पिंपळनेर सर्कल मधील युवा तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम संपन्न

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रवेशित प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम आयोजित करण्यात आला.



या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची ओळख व्हावी, ग्रंथालय, सांस्कृतीक विभाग, क्रीडा, अभ्यासक्रम, परीक्षापध्दती, शिक्षणातील लवचिकता, समजावी या उद्देशाने आयोजीत कार्यक्रमात सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्याना स्वत:ची ओळख व महाविद्यायामध्ये करत असलेल्या इतर विभागांची माहिती प्राध्यापकांनी विद्यार्थ्याना सांगीतली. त्यानंतर विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ, अभ्यासक्रमाची पुस्तके, कोश, नियतकालिके, वर्तमानपत्रे, ई-संसाधने, क्यू-आर कोड प्रणाली यांची माहिती उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी दिली. क्रीडा विभागाचे बॅडमिंटन कोर्ट, जीम, कबड्डी मैदान, चेस यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी ऋए जेनेरिक ईलेक्टिव या विषयाची माहिती दिली तसेच परिक्षेचे स्वरूप लेखी व अंतर्गत मुल्यमापन कसे आहे हे सविस्तर सांगितले. उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, प्रो. डॉ. अशोक लाखे, डॉ. स्मिता बसोले, डॉ. एल. बी. जाधवर, प्रो. डॉ. बालाजी नवले, डॉ. डी. बी. जाधव, प्रा. नागोराव वाघमारे यांनी एनईपी २०२० संबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांचा पुरेपूर उपयोग करावा. आपल्या आवडीच्या कलागुणांना विकसित करण्याचे कार्य महाविद्यालयात घडते. यामध्ये निपुण होऊन आपले व्यक्तिमत्व घडवावे व जीवनात यशस्वी व्हावे असे सांगितले. याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर महाविद्यालयातील एनईपी समन्वयक डॉ. स्मिता बसोले, इंडक्शन प्रोग्राम चे समन्वयक डॉ. इंद्रजित भगत यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकिय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले.

## 29 ऑगस्ट मुंबई आंदोलनाच्या निमित्ताने लिंबागणेश येथे चावडीवरील बैठक संपन्न

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार मराठा आरक्षणाच्या प्रमुख मागण्यांसाठी - मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण, कुणबी-मराठा समानतेची घोषणा, ५८ लाख नोंदींची त्वरित अंमलबजावणी, ओबीसी प्रमाणपत्र देण्याची सुलभ प्रक्रिया, आंदोलनातील कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेणे, तसेच कायमस्वरूपी आणि कायदेशीर आरक्षणाची हमी - या मागण्यांसाठी दि. २९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या भव्य आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर



बीड जिल्ह्यात सकल मराठा समाजाच्या वतीने गावोगावी बैठकांचे आयोजन सुरू असून बैठका पार पडल्या. या बैठकीत बीडहून आलेले मराठा सेवक युवराज मस्के पाटील, संजय वाघुले, नाना पवार, अमोल बागलाने, संजय गोडसे यांनी आंदोलनाची रुपरेषा स्पष्ट करत सर्व मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने मुंबईत उपस्थित राहावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. गणेश ढवळे यांनी केले. बैठकीस गावचे सरपंच बालासाहेब जाधव, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, अशोकराजे वाणी, अक्षय वाणी, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, दिनेश जाधव, दत्ता झोडगे, महावीर वाणी, लक्ष्मण आबदार, प्रकाश वायभट, अजय घोलप, बंडु बागल आदी मान्यवर उपस्थित होते.

# वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान; खा.सोनवणेंनी संसदेत मांडला प्रश्न

### हरीण, रानडुकरांनी नुकसान केल्यास भरपाई का नाही ?, शेतकऱ्यांच्या आवाज दिल्लीत पोहचविला

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात हरीण, रानडुक्करे व इतर वन्य प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होत आहे. नैसर्गिक आपत्ती सोबतच जंगली प्राणी उपद्रवामुळे शेतीमालाचे नुकसान बीड जिल्ह्यातील कांही भागात मोठ्या प्रमाणात होत असते. ही चिंतेची बाब आहे. हा उपद्रव रोकण्यासाठी उपाय योजना करण्याची गरज आहे. नुकसानग्रस्त शेतक-यांना पिकांची नुकसान भरपाई मिळत नाही. इतर राज्यांमधे हत्तीने पिकाचे नुकसान केले तर भरपाई मिळते,



पण आमच्या शेतकऱ्यांना हरीण, रानडुक्कर यांनी नुकसान केल्यानंतर नुकसान भरपाई का मिळत नाही?, असा सवाल उपस्थित करत वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीची भरपाई मिळावी तसेच हा उपद्रव रोकण्यासाठी शाश्वत उपाययोजना कराव्यात,अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली. जिल्ह्यातील शेतकरीपुत्र म्हणून खा.सोनवणे यांची ओळख असून ते वारंवार शेती प्रश्नावर आवाज उठवित आहेत.

**● मुख्यमंत्र्यांकडेही केली मागणी**

**केंद्रशासनाच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आवश्यक ती आर्थिक सुरक्षा मिळेल आणि शेतीसंबंधी टाळता येणाऱ्या धोका घटकांपासून संरक्षण मिळेल, मात्र महाराष्ट्र राज्यातील सर्वदूर भागामधे रानडुक्कर, हरिणे तसेच इतर जंगली प्राणी याचा शेतास होत असलेल्या उपद्रवामुळे शेतकरी त्रस्त आहेत. त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेमधे केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ड-ऑन कव्हरमधे रानडुक्करे, हरिणे व इतर जंगली प्राण्यांमुळे होत असलेल्या नुकसानीचा समावेश करावा व अशा भागामधे शेतीला कुंपण घालून हा उपद्रव रोकण्यासाठी उपाययोजना करव्यात यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना खा.बजरंग सोनवणे यांनी पत्र देऊन मागणी केली आहे.**

कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकुर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे, पंतप्रधान पीक विमा योजनेत नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीस संरक्षण मिळते तसेच शेतीला कुंपण घालण्यासाठी राज्य सरकारे

**● अशा आहेत महत्वाच्या मागण्या**

**१. महाराष्ट्रात पंतप्रधान पीक विमा योजनेच्या ड-ऑन कव्हरमध्ये हरिण व रानडुकरांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीचा समावेश करण्यास तात्काळ मान्यता द्यावी. २. हा पर्याय लागू झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्याबाबत योग्य ती माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून ते वेळेत या योजनेचा लाभ घेऊ शकतील. ३. तसेच, केंद्र व राज्य योजनांद्वारे उपलब्ध असलेल्या सोलार किंवा तारांचे कुंपण, भिंत बांधकाम इत्यादी प्रतिबंधात्मक उपायांनाही अधिक बळकटी द्यावी.**

उपाययोजना करतात मात्र, जंगली प्राण्यांमुळे होणारे नुकसान हे टाळता येण्यासारखे असल्याने आधी या योजनेत त्याचा समावेश नव्हता. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच विविध राज्य सरकारांच्या विनंतीनंतर, राज्य सरकारांना या नुकसानीचा 'ॲड-ऑन कव्हर' स्वरूपात समावेश करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तथापि, महाराष्ट्र सरकारने आतापर्यंत हा पर्याय लागू केलेला नाही. तसेच, केंद्र सरकारकडून 'डेव्हलपमेंट ऑफ वाइल्डलाईफ हॅबिटॅट्स', 'प्रोजेक्ट टायगर' आणि 'प्रोजेक्ट एलिफंट' या योजनांतर्गत राज्यांना आर्थिक मदत दिली जाते. यामध्ये काटेरी तारांचे कुंपण, सोलार ऊर्जेवर चालणारे कुंपण, कॅक्टसची जिवंत फेन्सिंग, भिंती इत्यादींची उभारणी करून पिकांमध्ये जंगली प्राण्यांची घुसखोरी रोखण्याच्या उपायांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यात हरीण, रानडुकरांमुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना वन्यप्राण्याने केलेल्या नुकसानीची भरपाई मिळावी, शिवाय पिक वाचविण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी खा.सोनवणे यांनी केली आहे.

### श्री क्षेत्र चाकरवाडी म्हणजे परमार्थाचे उभे पीक बालाजी महाराज बोराडे यांचे प्रतिपादन

## बीड जिल्हा संतांची भूमी म्हणुन ओळखली जाते

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये भजन केलं तर पुण्य भेटते. जुने माणसे खूप भाग्यवान असतात. परमार्थाचे उभे पिक हे चाकरवाडी मध्ये आहे. महाराष्ट्रातील नव्हे तर जगातील एकमेव ठिकाण २४ तास अन्नदान सेवा सुरू आहे ते म्हणजे श्री क्षेत्र चाकरवाडी आहे. प्रति वर्षाप्रमाणे विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या आशीर्वादाने आणि ह. भ. प महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह व बाळनाथ महाराज यांचा पालखी सोहळ्यातील तिसऱ्या दिवसाची कीर्तन सेवा ह. भ. प बालाजी महाराज बोराडे यांची संपन्न झाली. जगामध्ये सर्वोत्तम सेवा कोणती असेल तर ती संत सेवा आहे त्या साठी संतांची सेवा करा तुम्हाला कोणत्याच गोष्टीची कमी पडणार नाही. दादा माऊली यांच्या आशीर्वादाने कोणत्याच गोष्टीची कमतरता पडणार नाही. दादा माऊली यांची तुम्ही सेवा करा असा भाविकांना महाराजांनी संदेश दिला. देवाला जर कोणती सेवा आवडत असेल तर ती संत सेवा आहे.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळवीण्यात येते की आमचे आशिल सचिन परमेश्वर चव्हाण हल्ली मु. गोरेगाव मुंबई, यांनी दिलेल्या माहिती व सुचना व अधिकारावरून आम जनतेस कळवीण्यात येते की, आमचे पक्षकार याने सौ. सोनाली मन्मथ खवले रा. आंबीका नगर बीड हल्ली मु. जालना यांचे नावे असलेली र.डी.जि.प.बीड, सब.डि.पं.स.ता.बीड पैकी तरफ पिंगळे मोहल्ला धानोरा रोड बीड येथील नवीन वाढीव नगर परिषद हद्दीचे आतिल सर्वे नं. १५७ / आ मधील तिचे मालकी व ताब्यातील प्लॉट ज्यास नगर परिषद बीड वार्ड १ गट. १ मालमत्ता क्रमांक १-१-१०५९ पैकी नवा १-१-१०९५ असा मिळालेला असुन ज्याची लांबी पुर्व-पश्चिम ४०फुट व रूंदी दक्षीण-उत्तर ४० फुट असुन एकुण क्षेत्रफळ १६०० चौ. फुट म्हणजेच १४८.६९ चौ.मिटर आहे. ऑनलाईन रेकॉर्ड प्रमाणे त्याचे क्षेत्रफळ १४९ चौ.मिटर आहे. ज्याची च. तु. सिमा खालील प्रमाणे.

**पुर्वेस : ३० फुट रूंदीचा रस्ता.पश्चिम : शिल्लक प्लॉट.**
**दक्षिण : मुनोत यांनी विक्री केलेला प्लॉट.उत्तर : २० फुट रूंदीचा रस्ता.**

वरील मिळकत लिहुन देणार सोनाली मन्मथ खवले यांनी स्वतः खरेदी केलेली असुन तिने सदर मिळकतीचा ईसारपावतीचा करार हा लिहून देणार सचिन परमेश्वर चव्हाण यांच्या हक्कात दिनांक ०७/०८/२०२५ रोजी करुन दिलेला आहे. वरील मिळकत निर्जोखीम, निर्विवाद मालकीचे असल्याची खात्री दिलेली असुन व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी याद्वारे सर्व संमतीने म्हणजे ज्यांचे कोणतेही हितसंबंध वरील मिळकतीस असल्यास तसेच, तारण, गहाण, खरेदी विक्री किंवा अन्य प्रकारचे व्यवहार असल्यास आजपासुन १५ दिवसाचे आत आक्षेप नोंदवा. १५ दिवसाचे कोणाचाही आक्षेप नाही आला तर सदर प्लॉटचा व्यवहार हा पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर कोणाचाही आक्षेप अथवा उजर ऐकुन घेतला जाणार नाही.

करीता हे जाहीर प्रगटन .
ठिकाण: बीड.
दिनांक : ०८/०८/२०२५

**जाहीर प्रगटन देणार- सचिन परमेश्वर चव्हाण**
**मार्फत : ॲड. बालाप्रसाद ह. करवा,**
**सारडा नगरी, बीड ता.जि.बीड, मो.नं.९८२२०८८४३१**



## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही.सी. जोशी ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १२६४/२०२५**
**शेषाबाई त्रिंबक बीबे वि. निरंक**

ज्यापेक्षा जगन्नाथ दादाराव घाडगे हे दिनांक १८.०६.२०१८ रोजी आहेरवडगाव ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार- १. मच्छिंद्र पि. जगन्नाथ घाडगे, वय-५७ वर्षे, धंदा शेती, रा. आहेरवडगांव, ता.जि.बीड

रामनाथ पि. जगन्नाथ घाडगे, (मयत) वारस २-१) राहुल पि. रामनाथ घाडगे, वय-४१ वर्षे, धंदा शेती, रा. आहेरवडगांव, ता. जि. बीड २- १) सुखमल भ्र. रामनाथ घाडगे, वय-६८ वर्षे, धंदा शेती, रा. आहेरवडगांव, ता.जि.बीड.

अर्जदार क १ व २ हे मयत नामे **जगन्नाथ दादाराव घाडगे** यांची मुले असून, अर्जदार क. २. मयत असून त्याचा वारस २-१ मुलगा व मयताचा नातु आहे. २-२ ही मयत मुलाची पत्नी आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू मयत जगन्नाथ दादाराव घाडगे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २२/०९/२०२५ आहे.**

आज दिनांक ७ ऑगस्ट २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**(ॲड. घोडके एस.डी. यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का



## जाहीर प्रगटन

**मा.श्री कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १२७१/२०२५**
**सुनंदा पवार वि. निरंक**

**मागणी: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः१. सुनंदा भ्र.भारत पवार, वय ५९ वर्षे, धंदा घरकाम, रा. मसरत नगर, जिजामाता चौक, बीड, ता.जि. बीड, २. संतोष पि.भारत पवार, वय: ३४वर्षे, धंदा शेती, रा.मसरत नगर, जिजामाता चौक, बीड, ता.जि. बीड, ३. संजीवनी भ्र. गोरख सतकर, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. पोस्टमन कॉलनी, कॅनॉल रोड, शाहुनगर, बीड, ता.जि. बीड ४. सुवर्णा संजय खरात, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. धुळे ता. जि. धुळे

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे भारत तुकाराम पवार, राहणार जिजामाता चौक, बीड ता. जि. बीड हे दिनांक १०/०७/२०२५ रोजी जिजामाता चौक, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा तर अर्जदार क. ३ व ४ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे भारत तुकाराम पवार यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की.. सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट मदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत भारत तुकाराम पवार यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख १६/०९/२०२५ आहे.**

आज दिनांक ०८/०८/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ श्री. पांडे एम. डी.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. ०९ ऑगस्ट २०२५ ● पान ४

## थोडक्यात

### लोकनेते गोपीनाथ मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना विजयी करून परिवर्तन घडवा: नवनाथ अण्णा शिराळे पाटील



बीड । प्रतिनिधी

वैद्यनाथ बँक निवडणूक २०२५ लोकनेते गोपीनाथ मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना विजयी करून परिवर्तन घडवा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी सर्व मतदार बंधू आणि भगिनी यांना कळकळीचे आवाहन विनंतीपूर्वक केले आहे वैद्यनाथ बँक ही अतिशय उत्कृष्ट उल्लेखनीय बँक असून सर्व ठेवीदारांच्या ठेवी अतिशय चांगल्या प्रकारे ठेवून त्यांना चांगल्या प्रकारे ठेवीदारांना बँकेच्या माध्यमातून लाभ मिळत आणि वैद्यनाथ बँक अतिशय यशस्वी बँक असल्याचे ठेवीदारांमधून बोलले जात आहे ही बँक महाराष्ट्रातच नव्हे तर आता दिल्लीमध्ये देखील या बँकेची शाखा स्थापन करण्याचे मानस असल्याचे बीड जिल्ह्याच्या माजी खासदार श्रीमती डॉक्टर प्रीतम ताई मुंडे यांनी मागच्या दोन दिवसापूर्वी झालेल्या बैठकीमध्ये बोलून दाखवले आहे म्हणून ही बँक आता राष्ट्रीय नॅशनलाईज दर्जाची पतसंस्था बँक म्हणून देखील आता भविष्यामध्ये ओळखली जाणार असल्याचे आता सर्व ठेवीदारांमधून बोलले जाऊ लागले आहे म्हणून आता सर्व मतदार बंधू आणि भगिनी यांनी या वैजनाथ बँकेच्या निवडणुकीमध्ये लोकनेते गोपीनाथ मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व विजयी उमेदवारांना विजयी करून बीड जिल्ह्यामधून परिवर्तन घडवावे असे आव्हान भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे .

### १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वतयारी आढावा बैठक



बीड । प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट २०२५ च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) शैलेस सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर संबधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमाच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाची रूपरेषा, आयोजनाची जागा, सुरक्षा व्यवस्था, शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग, सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छता मोहिमा, वाहतूक व्यवस्थापन, वैद्यकीय व्यवस्था, वीज आणि पाणीपुरवठा याविषयी जिल्हाधिकारी श्री. जान्सन यांनी संबधित यंत्रणेस सूचना दिल्या. १५ ऑगस्टच्या अनुषंगाने सांस्कृतीक कार्यक्रम जसे विद्यार्थ्याचे डान्स, देशभक्तीपर गीत, लोकगीत तसेच इतर कार्यक्रम आणि १५ ऑगस्टच्या कार्यक्रमासाठी आजी माजी स्वतंत्र सैनिक या सर्वांना कार्यक्रमासाठी अग्रहाचे निमंत्रण देऊन त्यांची एकाच सोयीने बैठक व्यवस्था करावी असेही श्री. जॉन्सन यांनी या बैठकीत सूचित केले. जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधित विभागांना परस्पर समन्वय साधून वेळेत तयारी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी जनजागृती कार्यक्रम राबवण्याचेही निर्देश दिले. शासनाच्या सूचनांनुसार १५ ऑगस्टचा शासकीय कार्यक्रम साजरा करण्यात येणार असून, यासाठी प्रशासन सज्ज असून नागरिकांनी कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

### भीषण अपघातात आई- वडील गमावलेल्या निष्पाप लेकरांसाठी परमेश्वर येवले पाटील यांचा एक लाख रुपयाचा जीवनदायी मदतीचा हात आणि समाजाला एकजुटीचा संदेश



पाटोदा । प्रतिनिधी

माणुसकी अजून जिवंत आहे, हे दाखवून दिले आहे समाजहितासाठी नेहमी तत्पर असणाऱ्या परमेश्वर येवले पाटील यांनी. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील घडलेल्या भीषण अपघाताने संपूर्ण जिल्हा हळहळून गेला होता.काही दिवसांपूर्वी बाळू केशव वायकर व त्यांची पत्नी लता बाळू वायकर हे पाटोदा येथे बाजारासाठी दुचाकी वरून जात असताना, पाटोदा शहराजवळ भरधाव बसने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या भीषण अपघातात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. या घटनेने त्यांच्या दोन चिमुकल्या मुलांवर दुःखाचा डोंगर कोसळला. आई- वडिलांच्या मायेच्या सावली शिवाय आयुष्याचा प्रवास सुरू करावा लागणार असल्याने गावभर हळहळ पसरली.या दुःखद प्रसंगाची माहिती मिळताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू सहकारी व लोकहिताची तळमळ जपणारे समाज सेवक परमेश्वर येवले पाटील स्वतः घाटेवाडीत दाखल झाले. त्यांनी या चिमुकल्यांच्या भविष्यासाठी १ लाख रुपयांची आर्थिक मदत तात्काळ सुपूर्द केली. मदत करताना परमेश्वर येवले पाटील म्हणाले या दोन चिमुकल्यांना केवळ पैशांची नव्हे, तर प्रेम, आधार आणि सुरक्षित भविष्याची गरज आहे. आपल्या समाजातील प्रत्येक दानशूर व्यक्तीने या मुलांसाठी पुढाकार घेतला, तर यांचे आयुष्य उजळून निघेल. समाजाने अशा प्रसंगी एक दिलाने उभे राहणे हीच खरी मानवतेची ओळख आहे.त्यांचे हे शब्द केवळ त्या क्षणापुरते नव्हते, तर संपूर्ण समाजाला विचार करायला लावणारे होते. कारण अपघात केवळ मृत्यू घडवत नाहीत, तर मागे उरलेल्या जिवांचे संपूर्ण आयुष्य बदलून टाकतात. राजकारणाच्या पलीकडे जाऊन लोकांच्या गरजांसाठी झटणारा, सर्वसामान्यांच्या अडचणी आपल्या अडचणी मानणारा आणि वेळोवेळी मदतीचा हात पुढे करणारा नेता म्हणून परमेश्वर येवले पाटील यांची ओळख आहे. शेतकरी, गरिब, विधवा, अपंग, शिक्षण घेणारे विद्यार्थी, नैसर्गिक आपत्तीतील पीडित अशा अनेकांना त्यांनी नेहमी मदत केली आहे. ▶ उर्वरित पान २ वर

## एकीकडे स्मशानभूमी अभावी उघड्यावर अंत्यसंस्कार....

# तर दुसरीकडे 8 वर्षांपूर्वी बांधलेल्या स्मशानभूमीत एकही अंत्यविधी नाही

**जिल्हा प्रशासनाचा अजब कारभार ; पैसा जनतेचा फायदा गुत्तेदाराचा ; बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील प्रकार : डॉ.गणेश ढवळे**



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील १३९४ गावांपैकी तब्बल ६५६ गावांमध्ये अजुनही स्मशानभूमीच अस्तित्वात नाही तर काही ठिकाणी बांधलेल्या स्मशानभूमीची अत्यंत दुरावस्था असुन बांधकाम ढासळलेल्या स्थितीत तर वादळी वाऱ्यासह पावसात पत्रे उडून गेल्याने निवारा नाही त्यामुळे पावसाळ्यात अंत्यविधी करण्यासाठी अडचण निर्माण होते. मृतदेहाची विटंबना होते. काही गावांमध्ये अंत्यविधी रोखल्याने मृतदेह शासकीय कार्यालयासमोर आणुन ठेवल्याच्या घटनांत वाढ होत आहे. दुसरीकडे मात्र जिल्हा प्रशासनाचा अजब कारभार पहावयास मिळत असुन बीड तालुक्यातील महाजनवाडी येथे ८ वर्षापुर्वी ६ लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीत अद्याप एकही अंत्यसंस्कार विधी झाला नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वापरात नसलेली स्मशानभूमी जिल्हा प्रशासनाने केवळ गुत्तेदार पोसण्यासाठीच बांधली का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी विचारला आहे.

गावापासून अडीच किलोमीटर गायरानात स्मशानभूमी बांधल्याने वापरात नाही : विश्वंभर गिरी ( सरपंच महाजनवाडी)

बीड तालुक्यातील महाजनवाडी गावची लोकसंख्या २२०० च्या आसपास असुन पुर्वी गावात चिंचेच्या झाडाखाली असलेल्या स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण होऊन घरे,गायगोठे बांधण्यात आले आहेत. त्याठिकाणी स्मशानभूमीची जागा शिल्लक नसल्याने तत्कालीन ▶ उर्वरित पान २ वर

## पिंपळनेर येथे गणेश बजगुडे पाटील यांच्या हस्ते काँग्रेसच्या शाखेचे उद्घाटन

**निवडणुकीच्या कामाला लागा बीड तालुक्यातील सर्व जागा काँग्रेस स्वबळावर लढणार : गणेश बजगुडे पाटील**



बीड । प्रतिनिधी

तालुक्यात काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी स्वबळाचा नारा देत पक्ष संघटन मजबुत करण्यासाठी गाव तिथे शाखा अभियानाच्या माध्यमातून नव्याने काँग्रेसच्या संघटन बांधणीची सुरुवात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील व जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात गाव तिथे शाखा अभियानाच्या माध्यमातून मागील आठवड्यात सुरु केली असुन या अभियानाची सुरुवात बीड तालुक्यातील मंजेरी हवेली व बाबामिया इनामदार नगर, तेलगाव रोड येथील शाखेचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या हस्ते करुन केली होती. काल बीड तालुक्यातील पिंपळनेर येथे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन ▶ उर्वरित पान २ वर

## डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यासह नगरसेवकांनी मुख्याधिकारी यांची घेतली भेट



बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी (दि.८) नवनियुक्त नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेतली. शहरातील रस्ते, अस्वच्छता, वीजपुरवठा, पाणीटंचाई तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले. यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन मुख्याधिकारी फडसे यांनी दिले. निवेदनात म्हटले की, शहरात घंटागाडी वेळेवर पाठवून नाल्यातील व रस्त्यावरील कचरा त्वरित उचलणे, मोठ्या नाल्यांची स्वच्छता करणे, बंद पडलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

**● नवनियुक्त मुख्याधिकाऱ्यांचा सत्कार**

**बीड नगरपरिषदेचे नवनियुक्त मुख्याधिकारी शैलेश फडसे हे नुकतेच रुजू झाले आहेत, त्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.**

# ऑनलाइन पिक विम्याच्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी त्रस्त!




वडवणी । प्रतिनिधी

ऑनलाइन पिक विमा भरण्यासाठी मागील दोन दिवसांपासून तांत्रिक अडचणी येत असल्याचे चित्र दिसून येत आहे.आधार कार्डची सत्यता पडताळणी करण्यासाठी संबंधित यंत्रणेकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने शेतकऱ्यांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

एकीकडे पिकविमा भरण्यासाठी शेतकऱ्यांकडून अल्प प्रमाणात प्रतिसाद मिळत असून त्यातच पिकविम्याच्या ऑनलाईन कामाच्या अनंत अडचणींमुळे शेतकऱ्यांना प्रतिक्षा करावी लागत आहे.दिवसभरात एकही अर्ज दाखल होत नसल्याने शेतकऱ्यांकडून संतप्त भावना व्यक्त केल्या जात आहेत.पिकविमा अर्ज भरण्यासाठी मुदतीचा कालावधी कमी असल्याने याकडे संबंधित विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन तात्काळ ही समस्या दूर करण्याची मागणी केली जात आहे.

**● मी पिक विमा अर्ज भरण्यासाठी मागील दोन दिवसांपासून आपले सरकार सेवा केंद्रावर चकरा मारत आहेत.मात्र तांत्रिक समस्यांमुळे मला रिकाम्या हाती माघारी फिरावे लागत आहे.यावर तात्काळ निराकरण करणे गरजेचे आहे.– विनोद गार्डी, शेतकरी**

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त विविध स्पर्धाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जयंती वर्ष असून त्यांच्या समाजोध्दारक, न्यायप्रिय व लोककल्याणकारी कार्याचा गौरव करण्याच्या दृष्टीने तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाण, शक्तीचा आदर नेतृत्वगुण मुल्याधिष्ठित विचारांची रजवणूक करण्यासाठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण बीड विभागाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात येत आहे. या अनुषंगाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनातील प्रसंगावर विविध स्पर्धाचे आयोजन करुन इयत्ता ०८ वी ते १२ वीतील नव युवक व युवतींना या स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार आहे. यामध्ये रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा (विषय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार), निबंध स्पर्धा (विषय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य) या स्पधांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सर्व स्पर्धा दि. १३ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत होणार आहेत. यामध्ये वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे ठिकाण तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डी. पी. रोड बीड, तर रांगोळी स्पर्धेचे ठिकाण तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे घेण्यात येणार आहेत.

रांगोळी, वक्तृत्व,निबंध स्पर्धेतील ▶ उर्वरित पान २ वर

# हृदय विकाराच्या रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी महादेव मातकर यांनी मिळवून दिली तात्काळ वैद्यकीय मदत



**आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली बीडचा शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष ठरतोय रुग्णाचा आधार**

बीड । प्रतिनिधी

रात्री बेरात्री वेळोवेळी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड गरजू रुग्णांसाठी नेहमीच धावून येण्याचे काम करत आलेला आहे. गेल्या दोन वर्षापासून शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड मार्फत आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्ह्यात जोरात आरोग्य सेवेचे अविरतपणे काम चालू आहे. अशाच एका रुग्णाबाबतीत शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष महादेव नाना मातकर यांना रुग्णांचे नातेवाईक बळीराम खाकरे राहणार सावरगाव तालुका केज, जिल्हा बीड येथील रुग्णाचा रात्री दोन वाजेच्या दरम्यान फोन आला. त्यावेळी रुग्णाने मातकर यांच्याकडे मदतीची मागणी केली असता वैद्यकीय चे जिल्हाध्यक्ष महादेव मातकर यांनी लगेचच हॉस्पिटल प्रशासनाला रुग्णांसंदर्भात आधार हॉस्पिटल येथील डॉक्टर यांना माहिती दिली. रुग्णाला शस्त्रक्रिया करण्यासाठी वैद्यकीय मदतीची गरज होती. मात्र वैद्यकीय निधी कसा मिळवायचा हे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाला माहिती नव्हते. तेव्हा लगेचच जिल्हाध्यक्ष महादेव मातकर यांनी डॉक्टर सानप यांचे आधार हॉस्पिटल येथे डॉक्टर यांच्याशी संपर्क साधून रुग्णाला वैद्यकीयनिधी मार्फत रुग्णाला मोफत शस्त्रक्रिया करून देण्याचे हॉस्पिटल ▶ उर्वरित पान २ वर